********************************* ISSN 2320-0197 **

# बालकामगार एक जागतिक समस्या

**डॉ. रवि आर.पाठेकर**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालय पालांदूर (चौ.) त. लाखनी जि. भंडारा ४४१९०४

**गोषवारा:**

प्रस्तुत शोधनिबंधात बालकामगारांच्या सामाजिक, आर्थिक आणि शारीरिक परिणामांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीपासून ते कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या नव्या संकटांपर्यंतचा परिप्रेक्ष्य दिला आहे. विविध आकडेवारी आणि तक्त्यांच्या साहाय्याने भारतातील आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील बालमजुरीच्या स्थितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच राज्यनिहाय तुलना, कार्यक्षेत्रनिहाय विभाजन, आणि बालकामगारांचे वय व लिंगानुसार वर्गीकरण यांची मांडणी केली आहे. बालकामगार निर्मितीमागील कारणे, परिणाम, आणि कायदेशीर, शैक्षणिक व सामाजिक उपाययोजना यांचे सविस्तर विवेचनही करण्यात आले आहे. निष्कर्ष म्हणून, बालमजुरी ही केवळ आर्थिक गरिबीची परिणती नसून ती सामाजिक उदासीनतेचेही द्योतक आहे. त्यामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक धोरणात्मक आणि प्रशासनिक उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

**बीज शब्द :** *बालमजुरी, बालगुन्हेगारी, बालतस्करी, बालहक्क, विधीसंघर्ष ग्रस्त मुले, अनौपचारिक अर्थव्यवस्था, बालकल्याण.*

===============================================================

**प्रस्तावना -:**

एखाद्या समाजाचे भविष्य हे त्या समाजात वावरणाऱ्या सुदृढ आणि स्वस्थ बालकांवर अवलंबून असते. ही बाब प्रसिद्ध इंग्रजी कवी वर्ड्सवर्थ यांनी त्यांच्या प्रसिद्ध ओळीत फारच सुंदरपणे व्यक्त केली आहे—"Child is father of the Man." त्यामुळे कोणत्याही राष्ट्राच्या आरोग्यासाठी आणि प्रगतीसाठी हे अत्यावश्यक ठरते की, त्या राष्ट्राने आपल्या मुलांना बालश्रमिक होण्यापासून संरक्षण दिले पाहिजे, जेणेकरून त्यांच्या मानसिक, शारीरिक, शैक्षणिक आणि भावनिक प्रगतीला अडथळा येणार नाही. मुलांना सामाजिक अन्यायापासून दूर ठेवणे, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास नैसर्गिकपणे होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. आपण सगळेच या समाजाचा भाग आहोत. अनेक वेळा सार्वजनिक ठिकाणी "आमच्याकडे बालकामगार कार्यरत नाहीत" अशा आशयाच्या सूचना फलकांवर वाचायला मिळतात. मात्र प्रत्यक्षात अनेकदा आपल्या डोळ्यांसमोर लहान मुले काम करताना दिसतात. काही वेळा आपल्याकडूनही नकळत अशा लहान मुलांना काम दिले जाते, आणि त्यांचे वय विचारात घेतले जात नाही. हेच लहान वयातील मुलं, जे वय हसण्या–खेळण्याचं असतं, त्या वयात त्यांच्या कोवळ्या खांद्यावर जबाबदाऱ्यांचं ओझं येतं. आपल्या घरातील किंवा आपल्या सभ्य समाजातील मुलं चांगल्या शाळांत शिक्षण घेत असतात, त्यांना कोणत्याही प्रकारच्या कष्टाची झळही लागत नाही. पण दुसरीकडे अनेक गरीब घरातील मुलं बालश्रमिक म्हणून काम करताना दिसतात. असं म्हणतात की, बालपण हा जीवनातील सर्वात सुखद काळ असतो, पण तो प्रत्येकाच्या वाट्याला येतोच असं नाही. आपण समाजात वावरत असताना अनेकदा एखाद्या चहा टपरीवर, उपहारगृहात, सिग्नलवर वस्तू विकताना, बाजारात भाजी विकताना किंवा बांधकामस्थळी विटा उचलताना लहान मुले दिसतात. मग मनात प्रश्न निर्माण होतो, या मुलांचा काय दोष? त्यांच्याही वाट्याला का येऊ नये बालपणाचा आनंद?

परंतु वास्तव फार वेगळं असतं. अनेक लहान मुलांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी लहान वयात काम करावं लागतं. आर्थिक गरिबी, अशिक्षितपणा, सामाजिक दुर्बलता यामुळे त्यांच्या आयुष्यातील बालपण हरवतं आणि काट्यांनी भरलेलं वास्तव त्यांच्या वाट्याला येतं.

'क्राय' या सामाजिक संस्थेने भारतातील १५ ते १८ वयोगटातील मुलांविषयी प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अहवालात भारतातील या वयोगटातील सुमारे २.३ कोटी मुले बालकामगार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यातील सुमारे १.९ कोटी मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये समतोल राखता न आल्यामुळे शिक्षण सोडावं लागलं आहे. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, देशातील शिक्षणधोरणात आमूलाग्र बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलांना माध्यमिक शिक्षण मोफत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, असे अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे.

अहवालात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, गेल्या वर्षी लहान मुलींच्या अपहरणाच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या, आणि अपहरण झालेल्या मुलींपैकी ६० टक्के मुली १५ ते १८ वयोगटातील होत्या, तर २५ टक्के मुली बलात्कार प्रकरणातील पीडित होत्या. या दोन गंभीर समस्यांवर उपाययोजना करणे अत्यावश्यक असून, ठोस आणि तात्काळ पावले उचलण्याची गरज आहे, असे अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

उपजीविकेसाठी काम करणारी, साधारणतः चौदा वर्षांखालील वयाची मुले अशी कामे करताना आढळतात, ज्या व्यवसायात विशेष कौशल्याची किंवा प्राविण्याची आवश्यकता नसते. ही मुले प्रामुख्याने हलक्या स्वरूपाच्या कामांमध्ये गुंतलेली असतात. कौटिल्याच्या *अर्थशास्त्र* ग्रंथातील उल्लेखावरून असे दिसते की, प्राचीन भारतातही बालमजुरीची प्रथा अस्तित्वात होती.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जेव्हा ग्रेट ब्रिटनमध्ये औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली, तेव्हा गिरण्यांतील धुळीचे व कारखान्यांच्या धुऱ्यांचे साफसफाईचे काम बालकामगारांकडून करून घेतले जात असे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) आणि युनिसेफ यांनी १२ जून २०२० रोजी न्यूयॉर्क आणि जिनिव्हा येथे सादर केलेल्या अंदाजानुसार, वर्ष २००० पासून बालमजुरीत ९४ दशलक्षांनी घट झाली होती. तथापि, कोविड-१९च्या संकटामुळे पुन्हा लाखो मुले बालमजुरीकडे ढकलली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

ILO च्या आकडेवारीनुसार, सध्या जगभरात १६० दशलक्ष मुले बालमजुरीमध्ये अडकलेली आहेत, जे दर दहा मुलांपैकी एक इतके प्रमाण आहे. आफ्रिका, आशिया आणि पॅसिफिक प्रदेश एकत्र घेतल्यास, जगभरातील प्रत्येक १० पैकी ९ बालकामगार या प्रदेशांतील आहेत. बालमजुरी करणाऱ्या मुलांची संख्या अमेरिकेत ११ दशलक्ष, युरोप आणि मध्य आशियात ६ दशलक्ष, तर अरब देशांमध्ये १ दशलक्ष इतकी आहे. दक्षिण आशियात २.९ कोटी बालकामगार असून, त्यापैकी १.७ कोटी भारतात आहेत. म्हणजेच भारतातील एकूण कामगारांपैकी सुमारे ६ टक्के बालकामगार आहेत.

२०२० च्या आकडेवारीनुसार, भौगोलिक विभागांनुसार बालमजुरीचे टक्केवारीतील प्रमाण पुढीलप्रमाणे आहे:
आफ्रिका – १८%; ल्याटिन अमेरिका – ४.३%; उत्तर अमेरिका – ०.२%; उत्तर युरोप – ०.२%; पूर्व युरोप – ४.६%; पश्चिम युरोप – ०.२%; दक्षिण युरोप – १.३%; पूर्व आशिया – २.८%; दक्षिण-पूर्व आशिया – ९.२%;

मध्य आशिया – ११.९%; पश्चिम आशिया – ६.३%; दक्षिण आशिया – ४.५%; पॅसिफिक बेटे – ७.७%

१९७१ च्या जनगणनेनुसार, आंध्रप्रदेशात बालकामगारांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९.२४% होते, तर केरळमध्ये ते सर्वात कमी – फक्त १.३०% होते. एकूण बालकामगारांपैकी ९३% ग्रामीण भागात आढळतात, तर उर्वरित नागरी भागात आहेत. ग्रामीण भागात ही मुले शेती, गुरेपालन, लघुउद्योग इत्यादींमध्ये तर नागरी भागात छोटी दुकाने, उपाहारगृहे आणि घरगुती उद्योगांमध्ये अत्यल्प वेतनावर काम करताना दिसतात.

**संशोधनाची उदिष्टे -:**

१) बालकामगार निर्माण होण्यामागील कारणांचा शोध घेणे.
२) बालकामगार समस्येच्या परिणामांचा आढावा घेणे.
३) बालकामगार समस्येवरील उपाय योजनांची चर्चा करणे.

**संशोधनाची पद्धती -;**

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रामुख्याने दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आलेला असून त्यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, साप्ताहिके, नियतकालिके. वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**बालमजुरांचा इतिहास -:**

२३ जून १७५७ रोजी इंग्रजी इस्ट इंडिया कंपनीने प्लासीच्या लढाईत बंगालचा नबाब सिराज-उद दौलायाचा पराभव केला व ब्रिटीश पूर्व भारताचे स्वामी बनले शेती ,उद्योग आणि व्यवसायाने समृद्ध असलेल्या या देशात मोठ्या प्रमाणात वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी स्वस्त मजुरांच्या वाढत्या गरजेमुळे अनेक मुलांना मजुरीसाठी भाग पाडले गेले. बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्या सहसा मुलाना कामावर ठेवतात, कारण त्यांना कमी पगारावर भारती करता येते. अनेक भारतीय मुलांना कामावर ठेवण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्यांना त्यांच्या मुलभूत अधिकाराची माहिती नसते. बालपणातील निरागास्पनाचा वापर अनेकांनी केवळ नफा मिळविण्यासाठी केला. आधुनिक जगाच्या समकालीन बाल्माजुरीमध्ये काही सांस्कृतिक समजुतीनी सुद्धा त्याला आधार दिला आहे. काहींच्या मते मुलांच्या चारित्र्य निर्माण आणि कौशल्य विकासासाठी काम करणे चांगले आहे. अनेक परंपरा अशा आहेत की मुले त्यांच्या पालकांच्या पावलावर पाउल ठेवता, अनेक संस्कृतीमध्ये मुलींच्या शिक्षणाला कमी महत्व दिले जाते आणी या मुलीना घरगुती सेवा पुराविन्यासारख्या कामात झोकून दिल्या जाते.

**बालकामगार कोण ?**

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याखेनुसार 'बालकामगार म्हणजे अशी अल्पवयीन व्यक्ती कि जिच्यावर अकाली प्रौढत्व लादले जाते. त्यांच्या शारिरीक आणि बौद्धिक क्षमतांचा विचार न करता कमी वेतनावर कष्टप्रद कामे करण्याची सक्ती केली जाते. तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालकामगार विषयक समितीने असे प्रतीपादन केले कि बालकामगार लोकसंख्येतील असा घटक आहे कि, ज्यास वेतन देउन कष्टप्रद कामे करण्यास भाग पाडले जाते. तर भारतीय घटनेतील कलम क्रमांक २४ मध्ये कारखान्यात किवा धोकादायक ठिकाणी काम करणारी वयाच्या १४ वर्षाखालील व्यक्ती म्हणजे बालकामगार होय. सध्या देशात होत असलेल्या बालकामगारांच्या शोषणाला पायबंद घालण्यासाठी केंद्र सरकारने कडक पाउल उचलत बालकामगार विषयक कायद्यात बदल करण्याचे ठरवले आहे. या कायद्यात बदल करण्यासाठी सन १९८६ मध्ये केलेल्या संशोधनाला पाया मानले आहे. या अंतर्गत आता बालकामगारांची वयोमर्यादा १४ वर्षावरून १८ वर्ष एवढी वाढविलेली आहे.

**कुठे आढळतात बालकामगार ?**

भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुले घागुती कामात, छोटे मोठे चाहाची दुकाने, आठवडी बाजार, गुजरी, मच मच्छी मार्केट, मटन मार्केट, रेस्टोरेंट, हॉटेल्स, कापड्फांची दुकाने आणि

मेट्रोपोलीटीन भागात आटोमोबाईल दुरुस्ती व्यवसायांमध्ये काम करत असताना आपणास सहसा दिसून येतात. तसेच कृषी क्षेत्रात जसे कि कापूस शेती, धान शेती, काच, माचीस, पितळ, कुलूप तयार करण्याचे कारखाने, सुईकाम, चिंध्या काढणे, विडी रोलिंग, चटई बनविण्याचा व्यवसाय, खान आणि दगड खान काम, विटा बनवणे आणि चहाच्या बागा. स्ट्रीट चिल्ड्रेन्स वृतपत्र विक्रेते,भिकारी आणि रस्त्यावर राहणारी मुले, बंधपात्रीत मुले म्हणजे ज्या मुलाना वडिलांच्या वारशाने मिळालेल्या जबाबदाऱ्या फेडण्यासाठी श्रम करीत आहेत त्याना बंधन कारक मुले समजली जातात, स्थलांतरित मुले हे भारतासमोरील एक महत्वाचे आव्हान आहे स्थलांतरित मुलाना नेहमीच बांधकामाच्या ठिकाणी मजुरीसाठी भाग पडले जाते. ई. व्यवसायात प्रामुख्याने बालमजूर दिसून येतात.

**कोविड-१९ चा परिणाम-**


कोविड-१९ सर्वात धक्कादायक परिणाम म्हणजे जगभरातील नोकऱ्या गमावणे हा होय. भारतात कोविड-१९ मुळेमे २०२० पर्यंत १२ कोटी लोग बेरोजगार झाले आहेत असे म्हटले जाते. यातील अनेक नोकऱ्या कपात स्थलांतरित कामगारांसारख्या पुरेशा सामाजिक सुरक्षा जाळ्याशिवाय असलेल्या अधिक दुर्लक्षित समुदायामध्ये झाला आहे. जागतिक अधिकोशाच्या मते भारतात साथीच्या आजारामुळे होणाऱ्या नोकऱ्या गमावल्यामुळे १.२ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली जाण्याची शक्यता आहे. आणि हि गरबी सरळ संबंधित बाल्माजुरीशी आहे. मागील एका संशोधनातून असे दिसून आले कि गरिबीत १ टक्के वाढ झाल्यास बाल्माजुरीत सुमारे ०.७ टक्के वाढ होते. कोविड-१९ साथीच्या आजारामुळे आर्थिक धक्के आणि त्याचे परिणाम यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे आणि अहवालात असा इशारा देण्यात आला आहे कि २०२२ च्या अखेरीस सुमारे ९० लाख अतिरिक्त मुले बाल मजुरीत ढकलली जाण्याचा धोका आहे.

**तक्ता क्र. १ वयोगट व लिंगनिहाय बालमजुरांची विभागणी**

| अ.क्र.. | वयोगट | प्रतिशत | लिंग | |
|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री |
| १ | ५-११ | ४८% | ५८% | ४२% |
| २ | १२-१४ | २८% | (८८ | (६४ |
| ३ | १५-१७ | २४% | दशलक्ष) | दशलक्ष) |

स्रोत- Census – 2011

**आलेख क्र. १ बालमजुरांचे वायोगटनिहाय प्रतिशत प्रमाण**




वरील सारणी व आलेख क्र. १ वरून स्पष्ट होते कि वयोगट ५-११ मधील बालमजुरांची टक्केवारी ही सर्वात जास्त म्हणजे ४८% असून वयोगट १५-१७ मधील बालमजुरांची संख्या ही २४% आहे. पुरुष बालमजुरांची

टक्केवारी ५८% म्हणजे ८८ दशलक्ष असून स्त्री बालमजुरांची संख्या ही ४२% म्हणजे ६४ दशलक्ष आहे.

तक्ता क्र. २ वरून दिसून येते की, सर्वाधिक बालमजुरीचे प्रमाण 'इतर कामगार' या गटात (35.8%) आहे. या गटात बांधकाम, चहा बागा, हॉटेल, कारखाने, प्लास्टिक, विटा भट्टी, पोलिशिंग, वाहतूक, रस्त्यावर विक्री इत्यादी क्षेत्रांचा समावेश होतो. अशा असंघटित व असुरक्षित क्षेत्रांमध्ये बालमजुरी अधिक आढळते, कारण तिथे कामाच्या अटी, सुरक्षा आणि पगार यांचा अभाव असतो.

**तक्ता क्र. २ क्षेत्र निहाय बालमजुरांचे प्रमाण (२०११)**

| अ.क्र. | कार्यक्षेत्र | संख्या ( दशलक्ष मध्ये) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | शेतकरी | 2.63 | 26.0 |
| 2 | शेती कामगार | 3.33 | 32.9 |
| 3 | घरगुती उद्योग कामगार | 0.52 | 5.2 |
| 4 | इतर कामगार | 3.62 | 35.8 |

स्रोत - Census 2001 and 2011

शेती कामगारांमध्ये बालमजुरीचे प्रमाण (32.9%) दुसऱ्या क्रमांकावर आहे. ग्रामीण भागात मुलांचे शारीरिक श्रम घेणे सामान्य मानले जाते. आर्थिक गरिबीमुळे व कुटुंबाच्या शेतीत किंवा इतरांच्या शेतात मजुरी करण्यासाठी लहान मुलांनाही कामाला पाठवले जाते. शिवाय, शेतकरी म्हणून कार्य करणाऱ्या बालमजुरांचे प्रमाणही लक्षणीय (26%) आहे. यामध्ये अनेक वेळा स्वतःच्या शेतात काम करणारे मुले येतात. ही परिस्थिती कुटुंबातील अपुरी मजुरी, बेरोजगारी, आणि अपुरी शैक्षणिक सुविधा यांमुळे उद्भवते.

घरगुती उद्योगांमध्ये बालमजुरीचे प्रमाण तुलनेने कमी (5.2%) दिसून येते. यात हस्तकला, विणकाम, कागद उद्योग, खेळणी बनवणे, अन्नप्रक्रिया इत्यादींचा समावेश होतो. हे काम प्रामुख्याने घराच्या किंवा लहान युनिट्सच्या माध्यमातून चालते आणि तिथेही बालमजुरी आहे, परंतु प्रमाण तुलनेत कमी आहे.

थोडक्यात, एकूण बालमजुरांपैकी बहुतांश मुले (94.8%) शेती, शेतमजुरी व इतर असंघटित कामांमध्ये गुंतलेली आहेत. ही स्थिती ग्रामीण भागातील आर्थिक दुर्बलता, शिक्षणापासून दुरावा, कौटुंबिक गरिबी व सामाजिक उदासीनता याचे प्रतिबिंब आहे. बालमजुरी संपविण्यासाठी कडक कायदे, त्यांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामीण भागात शिक्षण व रोजगाराच्या संधी वाढवणे, ही आवश्यक पावले आहेत.

**तक्ता क्र. ३ राज्यनिहाय बालमजुरांचे प्रमाण**

| अ. क्र. | **राज्ये** | संख्या (दशलक्ष मध्ये) | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | उत्तर प्रदेश | 2.8 | 21.5 |
| 2 | बिहार | 1.09 | 10.7 |
| 3 | राजस्थान | 0.85 | 8.4 |
| 4 | महाराष्ट्र | 0.73 | 7.2 |
| 5 | मध्य प्रदेश | 0.70 | 6.9 |

स्रोत - Census -2011

तक्ता क्र. ३ वरून स्पष्ट होते की, उत्तर प्रदेश सर्वाधिक बालमजूर असलेले राज्य (21.5%) आहे. तर बिहार दुसऱ्या क्रमांकावर (10.7%) आहे. या राज्यांत बालमजुरीचे प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे. यामागील प्रमुख कारणे म्हणजे, लोकसंख्येचा प्रचंड भार, शिक्षणाचे कमी प्रमाण, कुटुंबांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असणे, वडिलोपार्जित व्यवसायात मुलांची सक्तीने मदत घेणे. विणकाम, कागद उद्योग, काच कारखाने इ. उद्योगांमध्ये बालमजुर वापरले जातात.

राजस्थानमध्ये बालमजुरांचे प्रमाण 8.4% आहे; तेथे मुख्यतः हस्तकला, दगड काम, गहू/मोती झोत्याचे काम आणि छोट्या घरगुती उद्योगांमध्ये मुलांचा सहभाग असतो. वाळवंटी प्रदेशातील उपजीविकेच्या मर्यादित संधी बालमजुरीला खतपाणी घालतात. प्रगत समजल्या जाणाऱ्या **महाराष्ट्रात देखील बालमजुरीचे प्रमाण**

**7.2%** आहे. विशेषतः विटा भट्टी, शेती, साखर कारखाने, इतर असंघटित क्षेत्रांमध्ये मुले काम करतात. शहरांमध्ये रस्त्यावर विक्रेते, हॉटेल्स, वर्कशॉप्समध्येही बालमजुर दिसतात. **मध्य प्रदेश मध्ये** मुख्यतः आदिवासी व ग्रामीण भागात बालमजुरी प्रचलित आहे. जंगलावर आधारित उद्योग, शेती व घरगुती कुटिर उद्योगांमध्ये मुले काम करतात.

वर नमूद पाच राज्यांमध्ये एकूण 55% पेक्षा अधिक बालमजूर आहेत, जे राष्ट्रीय पातळीवर अत्यंत चिंताजनक बाब आहे. या राज्यांमध्ये बालमजुरी वाढण्यामागील मुख्य कारणांची चर्चा पुढील प्रामाणे करता येईल.

**बालकामगार निर्माण होण्यामागची कारणे -**

१) **दारिद्र्य –** हे भारतातील या समस्येचे सर्वात मोठे कारण आहे. गरीब कुटुंबातील मुलांना त्यांच्या कुटुंबाला मदत करण्यासाठी अनेकदा काम करावे लागते. ते कारखान्यांमध्ये, शेतात किवा अनौपचारिक अर्थव्यवस्थेत काम करीत असताना दिसून येतात. म्हणून कौटुंबिक दारिद्र्य हे एक बालकामगार निर्माण होण्यामागील महत्वाचे कारण आहे.

२) **अनौपचारिक अर्थव्यवस्थेची वाढ.** अनौपचारिक अर्थव्यवस्था लहान व्यवसाय आणि स्वयंरोजगार कामगारांनी बनलेली असते. अनौपचारिक क्षेत्रा मध्ये बालकामगार कायद्याची अंमलबजावणी करणे अवघड असल्याने अनौपचारिक अर्थव्यवस्था त्याना कामावर ठेवते.

३) **दर्जेदार शिक्षणाचा अभाव –** : भारतातील अनेक मुलांना चांगल्या शाळांमध्ये प्रवेश मिळत नाही. जेव्हा मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत नाही तेव्हा ते शाळेत जाण्याएवजी कामावर जातात.

४) **जागरूकतेचा अभाव** -: बहुतेक पालकांना या समस्येच्या शारिरीक, मानसिक आणि बौद्धिक दुष्परिणामां बद्दल माहिती नसते. त्यामुळ कित्येक पालक कुटुंबाला हातभार लागेल या हेतूने लहान मुलांना कामावर पाठवतात.

५) **बेरोजगारी** -: भारतामध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक असल्या मुळे कुटुंबातील प्रौढ सदस्यांना काम मिळत नाही त्यामुळे कुटुंबाचे उत्पन्न घटते व कुटुंबातील सदस्यांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा परिस्थितीत कुटुंबातील मुलांना सक्तीने कामावर पाठवावे लागते यामधून सुद्धा बालकामगार निर्माण होतात.

६) **कौटुंबिक समस्या** -: कौटुंबिक समस्यांमध्ये कुटुंबाचे उत्पन्न कमी पडत असल्या मुळे काही पालक आपल्या मुलांना सक्तीने कामावर पाठवतात किवा काहींच्या बाबतीत नाईलाजाने काम करण्यास भाग पडते. तसेच कुटुंबातील आजारपण,कुटुंबातील सदस्यांमधील व्यसनाधीनता इत्यादी अनेक कौटुंबिक समस्या बालकामगार निर्मितीसाठी जबाबदार आहेत.

७) **पालाकांमधील निरक्षरता** -: पालकांमधील निराक्षार्तेमुळे मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते आणि कधी सक्तीने तर कधी नाईलाजाने काम करण्यास प्रवृत्त केले जाते. अल्प वेतनावर अशी मुले राबतात. मुलांना शिक्षण देणे हि एक प्रकारे पालकांनी मुलांमध्ये केलेली गुंतवणूक समजली जाते. या गुंतवणुकीचा दीर्घकालीन फायदा पालकांना होत असतो परंतु भविष्यात विलंबाने होणार्या फायद्यापेक्षा ताबडतोब होणाऱ्या फायद्यास पालक प्राधान्य देतात. त्यामुळे मुलांना चांगले शिक्षण देण्याकडे पालकांचा कल नसतो. व हे सगळे पालकांच्या निरक्षरते मुळे घडते.

८) **अनाकर्षक शैक्षणिक परिसर** -: शाळांचे आंतर्बाह्य स्वरूप निराशाजनक व शाळेचे शैक्षणिक व्यवस्थापन उत्साहवर्धक नसल्यामुळे मुलांचे शाळेत मन लागत नाही शिकण्यात त्यांना आवड निर्माण होत नाही. म्हणून अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडून नोकरी व्यवसायाकडे किवा माजुरीकडे वळतात.

९) **मोठे कुटुंब** –: पालन पोषण, संगोपन योग्य प्रकारे होऊ शकत नाही. कुटुंबांचे कमी उत्पन्न आणि

कुटुंबातील सदस्य संख्या जास्त यामुळे कुटुंबातील सदस्यांच्या गरजा भागविणे कुटुंबाला कठीण जाते आणि त्यामुळे अशा कुटुंबात मुलांना कामावर पाठविले जाते.

**१०) स्थलांतरण** -: आपल्या मूळ गावी कुटुंबाचा चरितार्थ चालविणे कठीण झाल्यामुळे अनेक कुटुंबांनी शहरी भागात स्थलांतर केलेले आहे. स्थलांतर करण्या मागचा त्यांचा उद्देश स्वताला आणि त्याच बरोबर त्यांच्या मुलांना शहरात व्यवसाय मिळून कुटुंबाचा चरितार्थ भागविणे हा असल्याचा जाणविते.

**११) पालकांचे निधन** -: कुटुंबातील पालकांचे निधन हे एक कारण बालकामगार निर्माण होण्यासाठी कारणीभूत आहे.

**बालकामगार समस्येचे परिणाम** -:

**१) आरोग्याची समस्या** -: कोवळ्या वयातच परिस्थितीच्या रेट्यामुळे बाल्काम्गाराना कुटुंबाच्या चरितार्थासाठी सक्तीने कामे करावी लागत असल्याने त्याचे वाईट परिणाम बालकांवर होत आहे. नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी त्यांना अनेक तास काम करावे लागते व कामाच्या स्वरूपानुसार विशिष्ट शारिरीक हालचाली कराव्या लागतात. तसेच कामाच्या ठिकाणी स्वच्छतेचा अभाव, आरोग्यास हानिकारक पदार्थांचे सानिध्य, पिण्याच्या पाण्याची समस्या अशा अनेक कारणांचा परिणाम त्यांच्या शरीरावर होतो आणि पर्यायाने वाईट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

**२) वाढती व्यसनाधीनता** -:

बालकामगारांच्या घराबाहेरील नोकरी व्यवसायामुळे त्यांच्यावर त्यांच्या पालकांचे प्रत्यक्ष नियंत्रण नसल्यामुळे बालकामगार मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे व्यसनांच्या आहारी जातात.

**३) वाढती बालगुन्हेगारी** - : १९८६ च्या कायद्यात १६ वर्षाखालील गुन्हेगारांना विधीसंगर्ष ग्रस्त म्हटले जाते. विधीसंघर्ष ग्रास्तांची आकडेवारी २००० मध्ये १६४१ गुन्हे दाखल झाल्याची असून २०१० माडे ४३१५,तर २०११ मध्ये ४७५५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. दहा वर्षात अशा गुन्हांच्या संख्येत तीनपटीने वाढ झाली असून हि धोक्याची घंटा मानली जाते.

**४) बाल तस्करी समस्या** -: बाल तस्करी हि बालमजुरीशी निगडीत आहे. ज्या मुलांची तस्करी झाली आहे त्यांना वेश्या व्यवसायात, बाल विवाह किवा दत्तक घेण्यास बाग पाडले जाते. कारण ते स्वस्त किवा बिनपगारी कामगार असतात. त्यांना घरातील नोकर किवा भिकारी म्हणून काम करण्यास भाग पाडले जाते आणि सशस्त्र गटांमध्ये सुद्धा भारती न्केली जाते.

**बालकामगार समस्येवरील उपाय योजना** -:

१) **घटनात्मक तरतुदी -:** अनुच्छेद २१ A संविधान (आठवी दुरुस्ती) कायदा,२००२ ने भारतीय राज्य घटनेत अनुच्छेद २१-A समाविष्ट केला आहे ज्या मुले ६-१४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा हा मुलभूत अधिकार आहे. कलम-२३ माणसाच्या वाहतुकीवर बंदी आणि सक्तीचे श्रम , कलम-२४ १४ वर्षा खालील कोणत्याही मुलाला कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कामात गुंतवून ठेवता येणार नाही.

२) **इतर उपक्रम** -: पेन्सील पोर्टल- नो चाईल्ड लेबर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कामगार आणि रोजगार मंत्रालयाने एक इलेक्ट्रोनिक प्ल्याटफॉर्म सुरु केला आहे. असंघटीत क्षेत्रातील मुलांची सुटका आणि पुनप्राप्ती ऑपरेशन स्माईल, ऑपरेशन मुस्कान ई. अनेक एन जी ओ बाल पुनर्वसनासाठी काम करतात जसे कि बचपन बचाओ आंदोलन, कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन फाउंडेशन, सेव्ह द चिल्ड्रेन ई.

**गुरुपाद स्वामी समिती, १९७९-** बालमजुरीच्या मुद्याचा अभ्यास करण्यासाठी हि समिती स्थापन करण्यात आली आणि काम करणाऱ्या मुलांच्या समस्या

हाताळण्यासाठी अनेक धोरणात्मक दृष्टीकोनाची शिफारस केली.

**आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने २००२** मध्ये बालकामगार विरुद्ध जागतिक दिवस स्थापन केला. दरवर्षी १२ जून हा दिवस जगभरात साजरा केला जातो.

३) गरिबी,बेरोजगारी,आणि कमी कमाई या सर्व बाबी बालमजुरीशी निगडीत आहेत. कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि मुलाना कामावर पाठविण्याची गरज दूर करण्यासाठी सामाजिक सुरक्षा कार्यक्रम आणि रोख हस्तातरनासाठी दृढ प्रयत्न केले पाहिजेत.

४) शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी तसेच शिक्षणाची गुणवत्ता आणि प्रासंगीता वाढविण्यासाठी शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे महत्वाचे आहे.

५) बाल्माजुरीशी संबधित विद्यमान भारतीय कायदे लागू करणे आवश्यक आहे.

६) जनहिताला चालना देण्यासाठी आणि बाल शोषण आणि बालमजुरीच्या धोक्याबद्दल व्यापक ज्ञान वाढविण्यासाठी राष्ट्रव्यापी प्रयत्न सुरु करणे आवशक आहे.

७) ज्या संस्था व उद्योग बालकामगारांच्या प्रतेक्ष व अप्रतेक्ष पणे गुंतलेली असतील अशा उद्योगांना सरकारने काळया यादीत टाकून त्याना सरकारतर्फे प्राप्त होणाऱ्याविविध सवलती बंद कराव्यात.

**निष्कर्ष -:**

बालकांच्या कल्याणासाठी, समाजाच्या प्रगतीसाठी आणि राष्ट्राच्या शाश्वत विकासाठी बालमजुरीला संबोधित करणे आणि दूर करणे महत्वाचे आहे. मुलांच्या हक्काचे संरक्षण आणि त्यांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी एकत्रित प्रयत्न, सर्वसमावेशक धोरणे आणि विविध भागधारकांच्या सक्रीय सहभागाची आवशकता आहे. बालकांच्या कायद्याच्या अंमलबजावणीत असंख्य समस्या आहेत. देशाचे समृद्ध भविष्य सुनिश्चित करण्यासाठी या समस्यांकडे अत्यंत तातडीने लक्ष देणे आवशक आहे. तसेच भारताने युएन च्या धरतीवर २०२५ पर्यंत सर्व प्रकारातील बालमजुरीचे उच्चाटन करण्याच्या उद्दिष्टांना समोर ठेऊन जे ठोस पावले उचललेली आहेत त्यात भारत कितपत यशस्वी होतो हे पाहणे हि तितकेच महत्वाचे असेल.

**संदर्भ:**


1. Shweta, D. (n.d.). *Child rights in India*. Arise Publishers & Distributors.
2. Chopra, J. K. (2005). *Child labour*. ABD Publishers.
3. Mujawar, R. W. (2008). *Child labour problem*. Arise Publishers & Distributors.
4. Joshi, Munjal. (n.d.). *बालश्रम: चुनौतियाँ और निराकरण*. Book Enclave, Jaipur.
5. हडप, गो. नि. (2005). *कामगार विश्व: दशा आणि दिशा*. रसिकराज प्रकाशन.
6. Government of Maharashtra – Directorate of Languages. (n.d.). https://directorate.marathi.gov.in
7. https://marathi.netive.in/chaild-labour-india
8. https://www.baalpan.com/samajik/baalkaamgaar/child-labour-act
9. https://www.mpscworld.com/balakanvishayak-samasya-adhikar-ani-yojana


***